# नमुना दोन

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सोलापूर**
**आर. टी. ई. मान्यता आदेश**
जाक्र.जिपसो/शिक्षण/खाप्राशा.२/प्राथ./RTE/ ७०३ /१७
सोलापूर. दिनांक :- ०९/०६/२०१७

प्रति,

**अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक**
**मॉर्डर्न एज्युकेशन सोसायटी पंढरपूर संचलित**
**अरिहंत पब्लिक स्कूल (सी.बी.एस.ई) मनिष नगर,पंढरपूर**
**ता.पंढरपूर जिल्हा सोलापूर**

**विषयः-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत...

संस्था/शाळेतील मुख्याध्यापकानी गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती पंढरपूर कार्यालयाकडे सन २०१६ ते २०१९ पर्यतच्या आरटीई मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार त्यानंतर या संदर्भात गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार/शाळेची तपासणी व शाळेने नियमानुसार आरटीई ॲक्ट मधील भौतिक सुविधा पूर्ण करीत असलेबाबत गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,पंढरपूर यांचेकडील जाक्र.पंसप/शिक्षण/आस्था/५७५/१७ दिनांक ७/६/२०१९ नुसार आरटीई मान्यते बाबतचे शिफारसीसह स्व-प्रतिज्ञापत्रास आधिन राहून

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सोलापूर सदर शाळेतील नावात बदल झाल्याने सुधारित नविन नावानुसार RTE नुतनीकरणाने **दिनांक ०७/०६/२०१६ ते ३१/०३/२०१९** पर्यतच्या कालावधीसाठी **प्राथमिक ते उच्च प्राथमिक इयत्ता १ ली ते ८ वी कायम विना अनुदानित इंग्रजी माध्यम** (CBSC)शाळेकरीता **अरिहंत पब्लिक स्कूल (सी.बी.एस.ई) मनिष नगर,पंढरपूर** या नावाने शाळेस तात्पुरती RTE-२००९ अंतर्गत मान्यता देण्यात येत आहे.

**सदरची मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या आधीन राहून देण्यात येत आहे.**

१)मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही. आणि **प्राथमिक इयत्ता ८ वी** नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२)बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

३)शाळा नजीकच्या दुर्बल घटकांतील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल, परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तेच्या बाबतीत देखील या प्रमाणकांचे अनुपालन करण्यात येईल.

४)परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेले बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळा स्वतंत्र बँक खाते देईल.

५)संस्था शाळा कोणतीही कॉम्पिटीशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.

६)कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारणार नाही.

७)(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो ज्या इयत्तेत असेल त्या इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकांस शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकांस प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकांस नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देणत येईल.

(पांच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमांच्या तरतुदी नुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेले किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता पाच वर्षाच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले त्यांची/तीची कर्तव्ये शिक्षण पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकांने/शिक्षिकेने खाजगी शिकविण्याच्या कामात स्वतःला गुतंवून घेवू नये,याची सुनिश्चिती शाळा करेल.

८) शाळा समुचित प्राधिकरणांने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमांचे पालन करील.

९)शाळा अधिनियमांच्या कलम २९ मध्ये विहित केलेप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०)शाळा अधिनियमांच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा आर.टी.ई च्या दहा निकषांची पुर्तता करीत असलेबाबत गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,पंढरपूर यांचेकडून स्व-प्रतिज्ञापत्र दिलेले आहे.

११)मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाही.

१२)शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम व क्रिडांगण हे केवळ शिक्षणांच्या व कौशल्यविकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदया करीता किंवा नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखा परीक्षेत व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्रांची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेताक असा आहे. हा या कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/शिक्षणाधिकारी हे वेळोवळी मागणी करतील, असे अहवाल व माहीती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल, अशा सुचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही कागदपत्रे असल्यास नुतनीकरण सुनिश्चित करावी.

१९)जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,सोलापूर

प्रत:-१) गट शिक्षणाधिकारी,पंचायतसमिती,पंढरपूर यांना माहितीसाठी रवाना.